बृहन्मुंबई महानगरपालिका

ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालय,वडाळा (प.) मुंबई ४०० ०३१.

क्र. एचओ / ८२३ / एएलएच दि.०३.०९.२०२५

**जाहिरात**

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालयाच्या आस्थापनेवरील 'औषध निर्माता' या संवर्गातील २ पदे व समाज विकास अधिकारी या संवर्गाचे १ रिक्त पद कंत्राटी तत्वावर दि.०१.१०.२०२५ ते दि.३१.०३.२०२७ या कालवधीकरिता प्रत्येकी १७९ दिवसानंतर ०१ दिवसाचा सेवा खंड देऊन कंत्राटी तत्वावर किंवा नियमित तत्वावर सदर पदे भरेपर्यंत यापैकी जे अगोदर असेल एवढ्या कालवधीसाठी कंत्राटी पध्दतीने रिक्त पदे भरण्यासाठी मा. महानगरपालिका आयुक्त यांची क्र.एमजीसी/एफ/६९६२ दि.२६.०६.२०२५ अन्वये मंजूरी प्राप्त झाली आहे. सदर मंजुरीच्या अनुषंगाने आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता/पात्रता धारण करणा-या व अटींची पुर्तता करण्या-या इच्छूक उमेदवारांकडून विहित नमुन्यामध्ये अर्ज मागविण्यात येत आहेत.

**पदाचा तपशील**

| अनु क्र. | पदनाम | एकुण पदे | ठोक मानधन | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| १ | औषधनिर्माता | ०२ | रु.२०,०००/- | १)उमेदवाराकडे राज्यशासनाचा तंत्रशिक्षण मंडळाची फार्मसीमधील पदविका किंवा मान्यताप्राप्त विद्यापिठाची फार्मसीमधील पदवी असणे आवश्यक आहे. (पदवीस प्राधान्य देण्यात येईल.)<br>२)उमेदवार महाराष्ट्र राज्य फार्मसी कौंन्सिलकडे नोंदणीकृत असावा.<br>३) संगणक ज्ञान प्राप्त झाला उमेदवार डीओईएसीसी सोसायटीचे 'सीसीसी' किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर' किंवा 'सी स्तर' स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एमएसीआयटी किंवा जीईसीटीचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम पुर्ण केलेला असावा.<br>४) उमेदवार माध्यमिक शालात प्रमाणपत्र परिक्षा किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षा किमान 50 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा. |
| २ | समाज विकास अधिकारी | ०१ | रु.२५,०००/- | १) उमेदवार शासनमान्यताप्राप्त विद्यापीठाचा समाजकार्यातील (Master of Social Work किंवा Master of Arts in Social Work) विषयात पुर्णवेळ पदव्युतर पदवीधारक असावा.<br>२) उमेदवार शासकिय / निम-शासकिय/महामंडळे/मंडळे /स्थानिक स्वराज्य संस्था किंवा अशासकिय संस्थांमधील सामाजिक कार्याशी संबंधीत योजनांमध्ये किमान 1 वर्षाचा सेवेचा अनुभव असावा.<br>३) उमेदवार १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेली मराठी भाषा विषयाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता १० वी) किंवा मराठी विषय असलेली तत्सम परिक्षा (उच्च स्तर / निम्न स्तर ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा निकषानुसार उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.<br>४) उमेदवाराने डीओईएसीसी सोसायटीद्वारे घेण्यात येणारी संगणकामधीन सीसीसी परिक्षा 'सीसीसी' किंवा 'ओ' स्तर किंवा 'ए ' स्तर किंवा 'बी ' स्तर किंवा 'क ' स्तरात उत्तीर्ण केलेली असावी अथवा त्याने/तिने महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण,मुंबईद्वारा संचालित एमएससीआयटी /जी.ई.सी.टी. चे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. |

**<u>अर्ज प्रक्रिया</u>** :-

अर्ज स्विकारण्याचे ठिकाण :-

वैद्यकिय अधिक्षक, अॅक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालय यांचे प्रशासकीय कार्यालय, मेजर परमेशवरन मार्ग, वडाळा (प) मुंबई ४०००३१ येथे दि. १९.०९.२०२५ रोजी सायंकाळी ४ वाजेपर्यत सादर करावेत.

अर्ज करण्याचा कालावधी :- दि.०८.०९.२०२५ ते दि. १९.०९.२०२५

**अ) <u>वयोमर्यादा</u>:-**

**उमेदवाराचे अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास** (दि. १९/०९/२०२५)

१.उमेदवाराचे वय अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास किमान वय १८ वर्ष व कमाल वयोमर्यादा ३८ वर्ष राहील.

**ब) <u>निवडीचे निकष व कार्यपध्दती:</u>**

१) पदवीस प्राधान्य देण्यात येईल.

२) प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. उमेदवार दोन किंवा तीन प्रयत्नांत उत्तीर्ण झाला असेल तर अंतिम गुणांमधून ५ गुण / १० गुण वजा करण्यात येतील. तीन पेक्षा जास्त प्रयत्नांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही. समान गुण धारण करणा-या अर्हता प्राप्त उमेदवारांना जन्म तारखेनुसार वयोजेष्ठतेने प्राधान्य देण्यात येईल.

३) शासकिय व निम्न शासकिय संस्थेमध्ये 'औषधनिर्माता'/'समाज विकास अधिकारी' म्हणुन काम करण्याचा अनुभव असल्यास (किमान 06 महिने अनुभव) प्रत्येक सहा महिन्याच्या काम करण्याच्या अनुभवासाठी दोन गुण अंतिम वर्षाच्या गुणांमध्ये अधिक केले जातील. किमान अधिकतम गुण २० पर्यंत ग्राह्य धरण्यात येतील.

४) सदर पदांची विहित केलेली शैक्षणिक अर्हता प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण न झाल्यास उमेदवारांच्या गुणांची वजाबाकी क्र. २ नुसार करण्यात येईल.

५) अंतिम वर्षाच्या गुणांमध्ये अनुभवाच्या गुणांची बेरीज करुन क्र. ४ नुसार त्यांची टक्केवारी काढण्यात येईल. सदर टक्केवारीच्या गुणांनुक्रमे निवड यादी तयार करण्यात येईल.

उपरोक्त निवडीच्या निकषांच्या आधारे अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. व निवड यादी रुग्णालयाच्या स्थानिक सुचना फलकावर प्रसारित करण्यात येईल.

**क) <u>अर्ज शुल्क</u>** :

उमेदवारांकडुन रु.७९०+१८% GST रु.१४३= रु.९३३/- एकूण शुल्क अर्जासाठी आकारण्यात येईल. कार्यालयातून चलन घेऊन अर्जाचे शुल्क महानगरपालिकेच्या नागरी सुविधा केंद्रात (CFC) रोखीत भरावे व शुल्क भरल्याची पावती विहीत कालावधीत सादर करावी. (सदर अर्ज शुल्क हे ना परतावा राहील व ते कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही.)

शुल्क भरल्याची मूळ पावती अर्जासोबत जोडून, पूर्ण भरलेला अर्ज सोबत सर्व कागदपत्रे (स्वत: सांक्षांकीत केलेल्या प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रतीसह) जोडून अॅक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालय रुग्णालयाच्या प्रशासकीय कार्यालयात आवक/जावक विभागात सादर करावे.

**<u>सर्वसाधारण अटी व शर्ती</u> –**

१) अर्ज विहित नमुन्यात स्वहस्ताक्षरात सर्व दृष्टीने पूर्ण असावेत. उमेदवाराचा भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी आणि पत्रव्यव्हारचा पत्ता (पिनकोड सह) सुस्पष्ट व पूर्ण असावा. विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

२) अलिकडच्या काळात काढलेले पारपत्र आकारातील उमेदवाराचे छायाचित्र त्याच्या स्वाक्षरीसह अर्जावर नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवावे. त्याच छायाचित्राच्या दोन अतिरिक्त प्रती पुढील निवड प्रक्रियेसाठी उमेदवाराजवळ ठेवणे आवश्यक आहे.

३) महिला उमेदवारांनी विवाहनोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहित महिला उमेदवार विवाहपूर्वीच्या नावाने अर्ज करू शकतात.

४) उमेदवाराने अर्जासोबत शाळा सोडलेल्या दाखल्याची प्रत, जन्म प्रमाणपत्र, दहावी, बारावी व पदवी प्रमाणपत्रे यांच्या स्वत: सांक्षांकीत केलेल्या छायांकित प्रती अर्जासोबत जोडवीत.

५) उमेदवारांना सादर केलेल्या छायांकित प्रमाणपत्रांची मुळ कागदपत्रे घेवून दिलेल्या दिनांकास कार्यालयात हजर राहावे लागेल. सदर दिनांक आपणांस ५ दिवस आधी आपण दिलेल्या ई-मेल आयडी वर कळविण्यात येईल.

६) उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास, तसेच उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी/न्यायालयिन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे.

७) कंत्राटी तत्वावर नियुक्ती निव्वळ तातपुरत्या स्वरुपाची एका वेळेस १७९ दिवसांचा असेल.

८) कंत्राटी कर्मचा-यांना देण्यात येणारे ठोक मानधना व्यतिरिक्त: कोणत्याही प्रकारचा महागाई भत्ता, घरभाडे भत्ता इत्यादी अनुज्ञेय असणार नाही.

९) उमेदवारास कंत्राटी कलावधीत साप्ताहिक रजा व सहा महिन्यांकरिता ७.५ नैमित्तिक रजा अनुज्ञेय असेल, त्या व्यतिरिक्त इतर कोणतीही रजा अनुज्ञेय नाही.

१०) त्यांनी दररोज नियमाने त्यांच्या कर्तव्याच्या वेळेनुसार बायोमेट्रिक हजेरी लावतील अन्यथा त्यांना गैरहजर धरण्यात येईल. त्यांची विना परवानगी गैरहजरी विना वेतनी गैरहजेरी करण्यात येईल.

११) नियुक्त झालेल्या उमेदवारास रुग्णालयीन सोयीनुसार तसेच प्राप्त झालेल्या आदेशानुसार कर्तव्यावर हजर राहणे आवश्यक राहील.

१२) नियुक्त होणा-या उमेदवार यांना मुंबई महानगरपालिका सेवा नियमावलीमधील नियम लागू राहणार नाही. ही नेमणुक निव्वळ कंत्राटी पध्दतीवर असेल व नियमित सेवेसाठी हक्क सांगता येणार नाही व कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.

१३) कंत्राटी कालावधीत काम करणा-या उमेदवारांची सेवा तात्पूरत्या स्वरुपाची असल्याने त्यांची सदर सेवा सेवाजेष्ठतेसाठी विचारात घेतली जाणार नाही किंवा सदर सेवेला सेवाजेष्ठतेसाठी प्राधान्य देण्यात येणार नाही.

१४) कंत्राट पध्दतीचे काम करणा-या उमेदवारांचे काम कराराच्या कालावधीमध्ये जर असमाधानकारक असेल तर अशा पध्दतीवरील नियुक्ती, कोणतीही पुर्व सुचना न देता संपुष्टात आणण्यात येईल.

१५) सदर कंत्राटी तत्त्वावरील पदधारकाच्या नियुक्ती कालावधीमध्ये उमेदवाराने शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

१६) कोणत्याही कारणास्तव निवड झालेल्यास उमेदवारास पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने १ महिना आगोदर पुर्वसूचना देणे बंधनकारक आहे तसेच आगाऊ सूचना न दिल्यास त्या महिन्याचे वेतन कपात केले जाईल.

१७) नियुक्त झालेल्या कंत्राटी कर्मचा-याने राजीनामा दिल्यास अथवा सेवा सोडून गेल्यास यादीवर उपलब्ध पुढील असलेल्या उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल.

१८) कराराच्या कालावधीत कंत्राटी पध्दतीवरील उमेदवारांना रु. ५००/- बॉन्ड पेपर वर करारनामा सादर करावे लागेल.

१९) निवडप्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्यास किंवा कोणत्याही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच नियुक्ती असल्यास कोणत्याही पुर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

२०) प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवडप्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मुंबई महापालिका आयुक्त यांना आहेत.

**विशेष सुचना:**

१) यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले/प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

२) टपालाने आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

३) अर्जाचे विहित मूल्य भरून त्याची पावती जोडल्याशिवाय अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाहीत.

४) सेवायोजना कार्यालय/प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांना देखील या जाहिरातीनुसार वैयक्तिक माहितीपत्रासह आणि आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या मूळ व सांक्षाकित प्रतींसह हजर राहणे आवश्यक आहे.

५) उमेदवाराने एकदा अर्ज केल्यानंतर विहित वेळ समाप्त झाल्यानंतर कोणतेही कागदपत्रे नंतर आणून दिल्यास ते कागदपत्रे ग्राहय धरले जाणार नाही व त्याचा अर्ज अपूर्ण समजून अपात्र ठरविण्यात येईल.

६) बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यांदीचा अधिकार दिलेला नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

७) जर एखादया उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

सही/-०३.०९.२०२५

वैद्यकिय अधिक्षक

ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालय

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## अर्जाचा नमुना

**पदाचे नाव :-**

| **उमेदवाराने त्याचे अलिकडे काढलेले पारपत्र आकाराचे छायंचित्र लावून फोटोवर स्वाक्षरी करावी** |
|---|

प्रति,
वैद्यकिय अधिक्षक,
ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालय
यांचे प्रशासकीय कार्यालय,
मेजर परमेश्वरन मार्ग, वडाळा (प)
मुंबई 400031

ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालय मध्ये ____________________________ पदाकरीता क्र.एच ओ /________ /एएलएच दि. _____ /_____ /२०२५ च्या जाहिरात नुसार मी खाली सही करणार विनंती अर्ज सादर करीत आहे. माझी सविस्तर माहिती खालील प्रमाणे आहे.

(१) संपूर्ण नाव :- (आडनाव प्रथम) (मराठीत)
आडनाव :- ____________________
नाव :- ____________________
वडिलांचे/पतीचे नाव :- ____________________
विवाहा पूर्वीचे संपूर्ण नाव (महिलांकरिता) :- ____________________

(२) जन्म दिनांक :- दिनांक _______ महिना ________ वर्ष ___________
दिनांक __________________ रोजी असलेले वय __________ महीने __________ दिवस ________

(३) लिंग :- पुरुष : ________ स्त्री : ________

(४) पत्ता (पत्रव्यवहाराचा) :-

| सध्याचा पत्ता | गावचा पत्ता |
|---|---|
| घर क्रमांक/इमारतीचे नाव:- __________________ | घर क्रमांक/इमारतीचे नाव:- __________________ |
| रस्त्याचेनाव:- __________________ | रस्त्याचेनाव :- __________________ |
| विभागाचे नाव आणि शहर:- __________________ | विभागाचे नाव आणि शहर:- __________________ |
| पिन कोड नं:- __________________ | पिन कोड नं:- __________________ |

(५) भ्रमणध्वनी क्रमांक :- ______________________ ईमेल आय डी :- __________________

(६) उंची :- __________ फूट __________ इंच, वजन :- __________ कि. ग्रा. __________,
शरीराची ठेवण :- किरकोळ /मध्यम /सुदूढ, वर्ण _________ नेत्र वर्ण _________वैयत्तिक खूण _________

(७) शैक्षणिक अर्हता:-

| **शैक्षणिक अर्हता** | **शालांत परीक्षा मंडळ / विद्यापीठाचे नाव** | **गुणांचा तपशील** | | | **उच्च माध्यमिक शालांत परिक्षेतील गुण** | | **उमेदवार किती प्रयत्नात परीक्षा उतीर्ण झाला** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **प्राप्त गुण** | **पैकी** | **टक्केवारी** | **मराठी** | **इंग्रजी** | |
| **दहावी** | | | | | | | |
| **बारावी** | | | | | | | |
| **पदवी** | | | | | | | |
| **पदविका** | | | | | | | |

(८) अनुभव :- ______________________________________________

(९) स्थानिक पोलिस ठाण्याचा संपूर्ण पत्ता :- ______________________________________

(१०) संगणक विषयक ज्ञान :-

एम.एस.सी.आय.टी किंवा शासनाने विहित केलेल्या संगणक विषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र :- आहे/ नाही

(११) उमेदवार सध्या नोकरी करीत आहे किंव नाही ? :- होय /नाही

असल्यास त्याबाबतचा तपशील द्यावा : ______________________________________

(१२) उमेदवार विरुद्ध पोलिस चोकशी/ न्यायालियन प्रकरण प्रलंबित/ प्रस्ताविण्यात आहे का ? :- होय / नाही

असल्यास त्याबाबतचा तपशील द्यावा : ______________________________________

(१३) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? :- होय / नाही

असल्यास, शिक्षेचा तपशील नमूद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जा सोबत जोडण्यात यावी.

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक असे जाहिर करतो की/ करते की, वरील माहिती जाणिवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांवर व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यास माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास माझी काहीही तक्रार राहणार नाही.

आपला/आपली विश्वासू,

अर्जदाराची नाव व सही/-

सोबत: प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रती